RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ५९] मंगळवार, एप्रिल ३०, २०२४/वैशाख १०, शके १९४६ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१, दिनांक ३० एप्रिल २०२४.

### अधिसूचना

क्रमांक न्यायाप्र-२५१९/प्र.क्र.७८/आस्था-१२.— महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (३९) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना (महा.५ च्या १९६२) आणि या अनुषंगाने ते सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांपैकी, महाराष्ट्र शासन, याद्वारे, खालीलप्रमाणे नियम करीत आहे. ते या आधी कलम २७४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार प्रकाशित केले गेले आहेत, म्हणजे :—

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२४ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट-पाच-अ मध्ये जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) (आरोग्य) श्रेणी-एक मधील अनुक्रमांक एक येथील **आरोग्य पर्यवेक्षक** नोंदीसमोर स्तंभ क्र.४ मध्ये, "नियुक्तीसाठी पात्रता आणि पद्धती" या शीर्षकाखाली, प्रचलीत नियमांऐवजी, पुढील प्रमाणे सुधारित नियम करण्यात येत आहे, म्हणजे :—

"(अ) आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) श्रेणी-१ पदावर यापैकी एका प्रकारे नेमणूक केली जाईल,—

(१) पदावर असलेल्या व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या अधीन, योग्य व्यक्तीची पदोन्नतीने, पुढील उमेदवारांमधून —

(क) जिल्हा परिषदेच्या सेवेतील जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) श्रेणी-II मधील आरोग्य सहायक (पुरुष), उक्त पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नियमित सेवा नसलेला आणि जो खालील निकष पूर्ण करतो, म्हणजे :—

(१) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण; आणि

(२) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी बारा महिन्यांचा मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे;

**किंवा**

(३) स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर) वा इतर समतुल्य कोणताही पाठ्यक्रम ;

(ख) जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क), श्रेणी-II च्या महिला स्वास्थ्य अभ्यांगतांमधून, जिल्हा परिषदेच्या सेवेत, उक्त पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नियमित सेवा नसलेल्या आणि खालील निकष पूर्ण करणाऱ्या, म्हणजे :—

(१) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण; आणि

(२) अठरा महिन्यांचे सहायक परिचारिका प्रसाविका प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असून महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणी केलेली आहे किंवा नोंदणीसाठी पात्र आहे; आणि

(३) ज्यांनी महिला स्वास्थ्य अभ्यांगत या सहा महिने मुदतीच्या पदोन्नती प्रशिक्षण पाठ्यक्रमाची परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे;

(ग) जिल्हा परिषदेच्या सेवेतील जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) श्रेणी-II मधील परिचारिका प्रसाविका (NM), या पदावर किमान तीन वर्षांची सेवा झालेली असावी.

(घ) उक्त पदावर असलेल्या व्यक्तींमधून पदोन्नतीद्वारे नेमणूक :—

(१) आरोग्य सहायक (पुरुष) खंड (क) मध्ये नमूद केले आहे ; आणि

(२) महिला स्वास्थ्य अभ्यांगता (LHV) व परिचारिका प्रसविका (NM) अनुक्रमे खंड (ख) आणि (ग) मध्ये नमूद केलेल्या आहेत, त्यानुसार खंड (घ) (१) व खंड (घ) (२) यांचे अंतर्गत प्रमाण ५० : ५० असे राहील.

(२) निवड समितीने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे निवडलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने, खालील निकष पूर्ण करणारे, उमेदवार म्हणजे :—

(१) वयोमर्यादा :—

(अ) किमान वयोमर्यादा .— पदावरील भरतीसाठी जाहिरातीनुसार अर्ज प्राप्त करण्याच्या शेवटच्या तारखेला किमान अठरा वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील.

(ब) कमाल वयोमर्यादा.— भरतीसाठी दिलेल्या जाहिरातीनुसार अर्ज प्राप्त होण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत आरक्षित प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वयोमर्यादा अडतीस वर्षांपेक्षा जास्त असू नये आणि आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाची त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त असू नये.

(२) किमान शैक्षणिक पात्रता :—

(१) मान्यताप्राप्त विद्यापीठातून विज्ञान शाखेतील पदवी असणे, आणि

(२) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी बारा महिन्यांचा मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे;

**किंवा**

(३) स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर) वा इतर समतुल्य कोणताही पाठ्यक्रम ;

(२) आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) श्रेणी - १ या पदावरील पदोन्नती व नामनिर्देशन यांचे प्रमाण ७५ : २५ असे राहील.

(३) (१) पदोन्नतीने आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) श्रेणी - १ या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार मराठी आणि हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याला या पदावर बढती मिळण्यापूर्वी त्या परीक्षा उत्तीर्ण करण्यापासून सूट देण्यात आली असावी.

(२) आरोग्य पर्यवेक्षक (गट-क), श्रेणी-१ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तीने , हिंदी व मराठी भाषा परीक्षा आगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली नसेल, त्याबाबतीत केलेल्या नियमानुसार त्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील तसेच जर हिंदी व मराठी भाषा परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण केल्या नसतील तर, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही आणि वरिष्ठ पदावरील नेमणुकीस पात्र राहणार नाही.

(४) (१) पदोन्नतीने आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) श्रेणी-१ या पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीकडे नियमांनुसार शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आदेशांद्वारे विहित केलेले संगणक प्रमाणपत्र (MS-CIT) आवश्यक राहील अथवा पदोन्नती मिळण्यापूर्वी सूट देण्यात आलेली असावी.

(२) आरोग्य पर्यवेक्षक (गट-क), श्रेणी-१ या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादित, शासनाने विहित केलेले संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील अन्यथा संगणक प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली असेल , अन्यथा वार्षिक वेतनवाढीस तसेच पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नतीसाठी पात्र राहणार नाही.

(५)(१) आरोग्य पर्यवेक्षक (गट-क) श्रेणी-१ या पदावर नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तींनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब घोषणा) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार लहान कुटुंबाची घोषणा अथवा शासनाकडून वेळोवेळी विहित केलेले इतर कोणतेही नियम, आदेश किंवा यासंदर्भात जारी केलेल्या कोणत्याही साधनानुसार घोषणापत्र सादर करावे लागेल.

(२) लहान कुटुंबाची घोषणा सादर केल्याच्या तारखेला दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेली व्यक्ती शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र ठरवली जाईल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर तिला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती शासकीय सेवेत सदर पदावर सेवा चालू ठेवण्यासाठी अपात्र ठरेल.

(६) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम, आदेश किंवा निर्णय यामध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीदेखील, या नियमान्वये नियुक्ती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुभाष इंगळे,**
शासनाचे उप सचिव.